|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## विकास विभाग

कबचौउमवि/११ए/अध्या.१८१/जन. १९-६/ १६ /२०१९ दिनांक- ११/०१/२०१९

**प्रति,**

कबचौउमविशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य व

मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक

**विषय : अध्यादेश-१८१ अंतर्गत प्रमाणपत्र, पदविका, उन्नत पदविका व पदव्युत्तर पदविका या करिअर ओरिएंटेड कोर्सेसला संलग्नता सातत्य /नवीन संलग्नता देण्याबाबत ...**

**संदर्भ :- उमवि/११/व्या.प्रमाणपत्र-पदविका/९२२/२००७, दि. ०५.०६.२००७**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या COP या योजनेंतर्गत प्रमाणपत्र, पदविका, उन्नत पदविका व पदव्युत्तर पदविका हे **करिअर ओरिएंटेड कोर्सेस** सुरु करणेसाठी परवानगी मिळालेली आहे व त्यासाठी अनुदान प्राप्त झालेले आहेत, असे अभ्यासक्रम, तसेच महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर स्वयंनिर्वाही ( Self Funding ) तत्वावर सुरु करावयाच्या वरील **करिअर ओरिएंटेड कोर्सेसच्या** परिचालनासाठी विद्यापीठाकडून तयार करण्यात आलेला अध्यादेश - १८१ ची प्रत सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांना पाठविण्यात आलेली आहे. तसेच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

तद्नुषंगाने ज्या महाविद्यालयांना / मान्यताप्राप्त परिसंस्थांना विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या COP योजने अंतर्गत अनुदान प्राप्त झालेले आहे अथवा ज्या महाविद्यालयांना त्यांच्या स्तरावर स्वयंनिर्वाही तत्वावर अध्यादेश १८१ अंतर्गत नविन **प्रमाणपत्र, पदविका, उन्नत पदविका व पदव्युत्तर पदविका या करिअर ओरिएंटेड कोर्स / कोर्सेस शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून** त्रैवार्षिक कालावधीसाठी सुरु करावयाचे आहेत, तसेच ज्या महाविद्यालयांमधील **शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून करिअर ओरिएंटेड कोर्सेसला दिलेल्या संलग्नतेचा त्रैवार्षिक कालावधी मे, २०१९ नंतर संपुष्टात येत आहे, अशा कोर्सेसला शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संलग्नता सातत्य** घ्यावयाचे आहे, अशा महाविद्यालयांनी नवीन संलग्नता / संलग्नता सातत्य मिळणेसाठीचे प्रस्ताव संदर्भांकीत अध्यादेश १८१ व मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने तयार केलेल्या नियमावलीस अनुसरुन विहित नमुन्यात नियमीत शुल्कासह **दि. - २८ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत किंवा दि. १५ मार्च, २०१९ पर्यंत नियमित शुल्क अधिक प्रती अभ्यासक्रम रु. २,०००/- विलंब शुल्कासह एकत्रित धनाकर्ष (डी.डी.) मा. वित्त व लेखाधिकारी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या नावाने काढून** विद्यापीठाच्या **विकास** विभागात **संबंधित कोर्सच्या समन्वयकांनी समक्ष** सादर करावयाचे आहेत. टपालाने प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर कार्यवाही करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

नियमावली, प्रस्तावासाठी अर्ज, प्रस्तावाचा नमुना, अभ्यासक्रमाबाबतचे प्रमाणपत्र व अभ्यासक्रमाच्या (Syllabus) पहिल्या व दुसऱ्या पृष्ठाचा नमुना यासोबत जोडलेला आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

**उपकुलसचिव, विकास विभाग**

**प्रत माहितीसाठी :-**

१) मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव.
२) मा. कुलगुरु महोदयांचे कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
३) मा. प्र - कुलगुरु महोदयांचे कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
४) मा. कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
५) मा. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, कबचौउमवि, जळगाव.